लोकमत

# ‘युजीसी’च्या स्ट्राइड योजनेत शिवाजी विद्यापीठाची निवड; संशोधनासाठी कोटीचा निधी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) संशोधनवृद्धीसाठी स्कीम फॉर डिसप्लिनरी रिसर्च फॉर इंडियाज् डेव्हलपिंग इकॉनॉमी (स्ट्राइड) ही नवी योजना सुरु केली आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातून एकमेव शिवाजी विद्यापीठाची बुधवारी निवड



झाली. या योजनेतून विद्यापीठाला एक कोटीचा निधी मिळणार आहे.

> ‘स्ट्राइड’मध्ये निवड होणे शिवाजी विद्यापीठासाठी आनंददायक आहे. विद्यापीठातील संशोधक विद्यार्थी, युवा प्राध्यापकांना संशोधनवृद्धीच्या अनुषंगाने प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यांच्यातील संशोधनविषयक क्षमतावृद्धीसाठी कार्यशाळा, चर्चासत्र, प्रशिक्षणवर्ग, आदी उपक्रम राबविण्यात येणार आहेत.
>
> - डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु

देशातील विद्यापीठ आणि महाविद्यालय पातळीवरील संशोधनाला चालना देण्यासाठी युजीसीने जुलैमध्ये स्ट्राइड योजना जाहीर केली. त्यामध्ये सहभागी होण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने ऑक्टोबरमध्ये अर्ज केला होता. त्यानंतर दिल्ली येथील युजीसीच्या कार्यालयात २६ नोव्हेंबर रोजी विद्यापीठाने संशोधनविषयक कामगिरी व संशोधनवृद्धीसाठी कोणते उपक्रम राबविले जाणार याबाबतच्या प्रस्तावाचे सादरीकरण केले.

प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्रा. डॉ. पी. डी. राऊत, सचिन पन्हाळकर, के. के. शर्मा आणि उपकुलसचिव संजय कुबल यांनी विद्यापीठाच्या वतीने हे सादरीकरण केले. त्यानंतर युजीसीने स्ट्राइडसाठी निवडलेल्या देशभरातील विद्यापीठ, महाविद्यालय आणि खासगी शैक्षणिक संस्थांची यादी बुधवारी संकेतस्थळावर जाहीर केली. त्यात १६ विद्यापीठे आणि १८ महाविद्यालये, खासगी शैक्षणिक संस्थांचा समावेश आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातून एकमेव शिवाजी विद्यापीठ आहे. स्ट्राइडअंतर्गत मिळणाऱ्या एक कोटी रुपयांच्या निधीतून संशोधनवृद्धीसाठीचे उपक्रम विद्यापीठाला राबवावे लागणार आहेत.

# विद्यापीठाला कोटीचा निधी

## विद्यापीठ अनुदान आयोगाच्या स्ट्राइड योजनेत निवड

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

देशातील विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावर संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्यावतीने (यूजीसी) जाहीर केलेल्या स्कीम फॉर डिसप्लिनरी रिसर्च फॉर इंडियाज् डेव्हलपिंग इकॉनॉमी (स्ट्राइड) या योजनेमध्ये शिवाजी विद्यापीठाची निवड झाली. बुधवारी निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. या योजनेसाठी महाराष्ट्रातून निवड होणारे शिवाजी विद्यापीठ हे एकमेव असून यासाठी विद्यापीठाला एक कोटीचा निधी मिळणार आहे.

यूजीसीने जुलैमध्ये स्ट्राइड योजना जाहीर केली. या योजनेसाठी निवड झालेल्या देशभरातील विद्यापीठ, महाविद्यालय आणि खासगी शैक्षणिक संस्थांची यादी बुधवारी यूजीसीच्या संकेतस्थळावर जाहीर झाली असून, त्यात १६ विद्यापीठ आणि १८ महाविद्यालयांचा समावेश आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातून एकमेव शिवाजी विद्यापीठ आहे. यामध्ये संशोधनवृद्धीसाठी विद्यापीठाने सहभागी होण्यासाठी अर्ज केला होता. २६ नोव्हेंबर रोजी विद्यापीठाने संशोधनासंदर्भात सुरू असलेले कामगिरी आणि संशोधनवृद्धीसाठी कोणते उपक्रम राबविले जाणार याबाबतच्या प्रस्तावाचे सादरीकरण केले होते. या निवडीमुळे विद्यापीठाला मिळणाऱ्या निधीतून संशोधनवृद्धीसाठीचे उपक्रम राबवण्यासाठी संयोजन करणे आवश्यक आहे. तसेच याअंतर्गत विद्यापीठातील संशोधक विद्यार्थी, युवा प्राध्यापकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे, अशी माहिती प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.



### 'नॅक'ला स्वीकृती अहवाल सादर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाकडून नॅशनल असेसमेंट अॅण्ड अॅक्रिडिशन कौन्सिलला (नॅक) स्वीकृती अहवाल मंगळवारी रात्री उशीरा सादर केला. शिवाजी विद्यापीठाची नॅक मूल्यांकनासाठी अहवाल देण्याची मुदत १० डिसेंबरला संपत आहे. गेल्यावेळी नॅककडून विद्यापीठाला अ मानांकन दर्जा मिळाला आहे. सध्या नॅक मूल्यांकनासाठी शिवाजी विद्यापीठाची तयारी सुरू आहे. दोन महिन्यांपूर्वी नॅक मूल्यांकनाच्या पार्श्वभूमीवर अधिविभागांमधील शैक्षणिक उपक्रमांची माहिती संकलित केली आहे. अधिविभागाकडून त्यांच्या अहवालाचे सादरीकरण करण्यात आले आहे. दरम्यान स्वयंअध्ययन अहवाल तयार करण्याचे काम डिसेंबरअखेर संपणार आहे.

# युजीसी स्ट्राइडच्या यादीत शिवाजी विद्यापीठाचा समावेश

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ४ : विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) संशोधनवृद्धीसाठी 'स्कीम फॉर डिसिप्लिनरी रिसर्च फॉर इंडियाज् डेव्हलपिंग इकॉनॉमी (स्ट्राइड) ही नवी योजना सुरू केली आहे. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाची निवड करण्यात आली. या योजनेतून विद्यापीठाला एक कोटीचा निधी मिळणार असून शिवाजी विद्यापीठ हे महाराष्ट्रातील पहिले विद्यापीठ आहे.

विद्यापीठ आणि महाविद्यालय पातळीवरील संशोधन व्हावे.



अधिकाधिक विद्यार्थ्यांना संशोधन करता यावे. त्यातून स्थानिक समस्यांचे निराकरण व्हावे, यासाठी युजीसीने स्ट्राइड योजना जाहीर केली. त्यामध्ये दिल्ली येथील युजीसीच्या कार्यालयात २६ नोव्हेंबर रोजी विद्यापीठाने संशोधनातील कामगिरीची माहिती देणारा प्रस्ताव दिला.

युजीसीने स्ट्राइडसाठी निवडलेल्या संस्थांची यादी बुधवारी जाहीर केली. त्यात १६ विद्यापीठे आणि १८ महाविद्यालय, खासगी शैक्षणिक संस्थांचा समावेश आहे. महाराष्ट्रातून एकमेव शिवाजी विद्यापीठ आहे. स्ट्राइडअंतर्गत मिळणाऱ्या एक कोटी रुपयांच्या निधीतून संशोधनवृद्धीसाठीचे उपक्रम विद्यापीठाला राबवावे लागणार आहेत, अशी माहिती प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

5 DEC 2019

तरुण भारत

# युजीसीच्या स्ट्राईड योजनेत शिवाजी विद्यापीठाची निवड

**राज्यातील एकमेव विद्यापीठ : आयोगाकडून १ कोटींचा निधी होणार उपलब्ध**

**कोल्हापूर :** विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (युजीसी) संशोधनवृद्धीसाठी 'स्कीम फॉर डिसप्लिनरी रिसर्च फॉर इंडियाज् डेव्हलपिंग इकॉनॉमी (स्ट्राइड)' ही नवीन योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेत महाराष्ट्रातून एकमेव शिवाजी विद्यापीठाची निवड झाल्याची माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यामुळे या योजनेंतर्गत विद्यापीठाला एक कोटीचा निधी उपलब्ध होणार आहे. हा विद्यापीठाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुराच म्हणावा लागेल.

विद्यापीठ आणि महाविद्यालय पातळीवरील संशोधनाला चालना देण्यासाठी युजीसीने जुलैमध्ये स्ट्राइड योजना जाहीर केली. या योजनेसाठी शिवाजी विद्यापीठाने ऑक्टोबरमध्ये अर्ज केला होता. त्यानंतर दिल्ली येथील युजीसीच्या कार्यालयात २६ नोव्हेंबर रोजी विद्यापीठाने सुरू असलेले संशोधन आणि संशोधनवृद्धीसाठी कोणते उपक्रम राबविले जाणार याबाबतच्या प्रस्तावाचे सादरीकरण केले होते. बुधवारी युजीसीच्या संकेतस्थळावर स्ट्राइडसाठी निवडलेल्या देशभरातील विद्यापीठ व महाविद्यालय आणि खासगी शैक्षणिक संस्थांची यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत १६ विद्यापीठे व १८ महाविद्यालय, खासगी शैक्षणिक संस्थांचा समावेश आहे. तर शिवाजी विद्यापीठ हे महाराष्ट्रातून एकमेव असल्याने शिवाजी विद्यापीठाची मान उंचावली आहे. युजीसीकडून एक कोटी रुपयांच्या निधीतून विद्यापीठातील संशोधक विद्यार्थी, युवा प्राध्यापकांना संशोधनवृद्धीच्या अनुषंगाने प्रशिक्षण दिले जाणार आहे, अशी माहिती प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

लोकमत

# विद्यापीठात १३ पासून 'दलवाईंचे साहित्य' चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी व शनिवारी (दि. १३ आणि १४) 'हमीद दलवाईंचे साहित्य आणि समाजकार्य' या विषयावरील चर्चासत्र होणार आहे. विद्यापीठातील मराठी अधिविभाग आणि पुणे येथील हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूटतर्फे चर्चासत्र आयोजित केले आहे.

विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषाभवनात शुक्रवारी सकाळी ११ वाजता ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्‌घाटन होईल. अभ्यासक विनय हर्डीकर यांचे बीजभाषण होणार असून, अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे असणार आहेत. त्यानंतर विविध सत्रांमध्ये मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष शमसुद्दिन तांबोळी, माजी अध्यक्ष सय्यदभाई, दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूटचे विश्वस्त इक्बाल मुल्ला, माजी सचिव अन्वर राजन, आदी विचार मांडणार आहेत. दुपारी ४.३० वाजता 'द अनसंग ह्युमॅनिस्ट' या माहितीपटाबाबत दिग्दर्शक ज्योती सुभाष संवाद साधणार आहेत. शनिवारी (दि. १४) दीपाली अवकाळे, गौरी पटवर्धन, चंद्रकांत पोकळे, लेखक सुनीलकुमार लवटे, आदी मनोगत व्यक्त करतील. दुपारी १२ वाजता डॉ. सदानंद मोरे, न्यायमूर्ती हेमंत गोखले यांच्या उपस्थितीत चर्चासत्राचा समारोप होणार आहे, अशी माहिती मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

लोकमत

# राष्ट्रीय सेवा योजना अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण सुरु

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामध्ये राष्ट्रीय सेवा योजना अधिकाऱ्यांच्या (एनएसएस) आठवडाभराच्या प्रशिक्षण कार्यक्रमास मंगळवारी (दि. ३) प्रारंभ झाला. हा प्रशिक्षण कार्यक्रम सोमवार (दि. ९ )पर्यंत चालणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन केंद्र सरकारच्या 'एन.एस.एस.'चे संचालक डॉ. डी. कार्तिकेयन यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. डी. कार्तिक्यन यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून 'व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर मार्गदर्शन केले. विविध नियमित कार्यक्रम, शिबिरे याविषयी त्यांनी माहिती दिली. या सर्व अधिकाऱ्यांनी माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे कसा संवाद साधावयाचा याबाबत माहिती देत असताना माहिती संवाद तंत्रज्ञानाचे आपल्या स्वयंसेवकांसाठी उपयोजन आणि आवश्यकता विशद केली. डॉ. निवास देसाई यांनी यावेळी हवामानातील बदल आणि मानवी समुदायावर होणारे परिणाम यांची माहिती दिली. हवा आणि हवामानातील बदलांनुसार मानव आणि मानवी समुदाय यांचे वर्तन, कार्य, स्वभाव यांच्यातही बदल होतात, असे त्यांनी सांगितले. विद्यापीठातील एन.एस.एस.चे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. प्रा. पी. आर. माळी यांनी आभार मानले

# विकासासाठी दिव्यांगांनी कटिबद्ध व्हावे

## डॉ. राजेंद्र हिरेमठ; शिवाजी विद्यापीठात चर्चासत्राचे आयोजन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ४ : दिव्यांग विद्यार्थ्यांनी चांगले नागरिक म्हणून देशाच्या आणि समाजाच्या विकासामध्ये हातभार लावावा. त्यासाठी आपले जीवनमान उंचाविण्यासाठी कटिबद्ध व्हावे, असे प्रतिपादन डॉ. राजेंद्र हिरेमठ यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या यूजीसी स्किम्स् फॉर परसन्स् विथ डिसएबिलिटीज या विभागामार्फत 'उच्च शिक्षण आणि सर्वसमावेशक पद्धतींमध्ये दिव्यांग व्यक्तींची प्रवेश योग्यता' या चर्चासत्रात ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.



**कोल्हापूर : चर्चासत्रात बोलताना डॉ. राजेंद्र हिरेमठ**

अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते. यावेळी वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. हिरेमठ म्हणाले, ''उच्च शिक्षणामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे प्रमाण अल्प आहे. ते वाढविण्यासाठी शिक्षणाबरोबरच आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सातत्याने कार्यरत असणारी संस्था म्हणून शिवाजी विद्यापीठाकडे पाहिले जाते. मागील काही वर्षापासून दिव्यांगांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन सकारात्मक झाला आहे. समाजाने दिव्यांगांप्रति सहानुभूती दर्शविण्यापेक्षा त्यांचे समर्थन करावे, त्यांना साथ द्यावी. विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची क्षमता वाढविल्यास रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होऊ शकतात. आपल्यामधील कमतरतांना न कुरवाळता, त्यांवर मात करून पुढे येणाऱ्या आव्हानांना सामोरे गेले पाहिजे. समाजासाठी, देशासाठी काम करण्याची जिद्द आणि ऊर्जा आपल्यामध्ये निर्माण केली पाहिजे.''

अध्यक्षीय मनोगतामध्ये कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, ''दिव्यांग विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणाच्या प्रवाहात सामील होणे आवश्यक आहे. कोणत्याही अडथळ्यामुळे मागे राहू नये. शैक्षणिक पात्रता वाढवून आधुनिक तंत्रज्ञानातील कौशल्ये आत्मसात केल्यास रोजगाराची संधी उपलब्ध होईल.'' यूजीसी स्किम्स् फॉर परसन्स् विथ डिसएबिलिटीज विभागाच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. लिटॉन प्रसाद यांनी सूत्रसंचालन केले. वनस्पतिशास्त्र विभागाच्या डॉ. कल्याणी पवार यांनी आभार मानले.

# ‘एनएसएस’च्या अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणास विद्यापीठात प्रारंभ

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ४ : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजना अधिकाऱ्यांच्या आठवडाभराच्या प्रशिक्षण कार्यक्रमास आज उत्साहात प्रारंभ झाला. हा प्रशिक्षण कार्यक्रम सोमवारी (ता.९) पर्यंत चालणार आहे. या कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून भारत सरकारच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. डी. कार्तिकियन उपस्थित होते. प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

यावेळी डॉ. डी. कार्तिकियन यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास या विषयावर मार्गदर्शन केले. विविध नियमित कार्यक्रम, शिबीर या विषयी माहिती दिली. या सर्व अधिकाऱ्यांना माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे कसा संवाद साधावयाचा याबाबत माहित देत असताना माहिती संवाद तंत्रज्ञानाचे आपल्या स्वयंसेवकांसाठी उपयोजन आणि आवश्यकता विशद केली. डॉ. निवास देसाई यांनी यावेळी हवामानातील बदल आणि बदलत्या हवामानाचा मानवी समुदायावर होणारे परिणाम यांची माहिती दिली. हवा आणि हवामानातील बदलांनुसार मानव आणि मानवी समुदाय यांचे वर्तन, कार्य, स्वभाव यांच्यातही बदल होतात, असे त्यांनी सांगितले. शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. प्रा. माळी पी. आर. यांनी आभार मानले.

# शिवाजी विद्यापीठात निसर्गोपचार परिषद

कोल्हापूर, ता. ४ : शिवाजी विद्यापीठात आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे महात्मा गांधी यांची १५० वी जयंती आणि निसर्गोपचार दिनानिमित्त राज्यस्तरीय योग व निसर्गोपचार परिषदेचे आयोजन केले होते. वि. स. खांडेकर भाषा भवनामध्ये ही परिषद झाली. परिषदेचे उद्घाटन राज्य पोलिस दलाच्या गुप्तचर विभागातील स्वेच्छानिवृत्त अधिकारी व योगसद्गुरू डॉ. कृष्णदेव गिरी यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. डॉ. सुमन बुवा यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी कृष्णदेव गिरी यांनी मनोगत व्यक्त केले. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी परिषदेला शुभेच्छा दिल्या. कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, डॉ. दिलीप पाटील, डॉ. अश्विनी देशमुख, डॉ. अर्चना त्रिवेदी हे उपस्थित होते. निता एरगोळे, सुमेधा सरदेसाई व डॉ. श्वेतलिना पाटील यांनी सूत्रसंचालन केले.